मागासवर्गीय गृहनिर्माण योजना [आदिवासी]

या योजनेची आदिवासी विकास विभागा-मार्फत अंमलबजावणी/परिरक्षण...

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्र. अमृ-१८९१/प्र.क्र.२७[१९१]/का.९
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:- ३१ जुलै, १९९२.

वाचा:- शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. टीसीएच-१०८५/१६०/[१२७]/का.९, दिनांक ४ ऑक्टोबर, १९८५.

शासन निर्णय:- दिनांक १ मे, १९८३ पासून मंत्रालयीन स्तरावर आदिवासी विकास विभाग स्वतंत्रपणे निर्माण करण्यात आल्यानंतर "आदिवासींच्या मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य" ही योजना राबविण्या-बाबत नियंत्रण व परिरक्षणाबाबतची कार्यवाही या नवनिर्मित विभागात कशाप्रकारे केली जावी याबाबतचे आदेश वर प्रस्तावनेत नमूद केलेल्या शासन निर्णया-अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "आदिवासी विभागामध्ये सदरहू योजना ही संचालक, आदिवासी विकास यांचेकडून विभागीय उपसंचालक, आदिवासी विकास यांचेमार्फत राबविली जाईल. संचालक, आदिवासी विकास हे सदर योजनेचे नियंत्रण अधिकारी राहतील. सदर योजनेचे योग्यरितीने संचालन व परिरक्षण होण्याच्या दृष्टीने या योजनेखाली विभागीय उपसंचालक, आदिवासी विकास यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे." परंतु आता आदिवासी विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील क्षेत्रीय प्रशासकीय यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आल्यामुळे संचालक व उपसंचालक, आदिवासी विकास ही पदे अस्तित्वात नाहीत. त्यामुळे संचालक, आदिवासी विकास व उपसंचालक, आदिवासी विकास यांना या योजनेबाबत प्रदान करण्यात आलेले अधिकार सध्या अस्तित्वात असलेल्या अधिकाऱ्यांना प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन आता असे आदेश देत आहे की, "आदिवासींच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य" ही योजना आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर यांचेमार्फत राबवावी. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे या योजनेचे नियंत्रण अधिकारी राहतील. या योजनेचे योग्यरितीने संचालन व परिरक्षण होण्याच्या दृष्टीने अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर यांना या योजनेसाठी या शासन निर्णयान्वये "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी

..२

17 AUG

या योजनेखालील कार्यभाराचे विभाजन संबंधीत अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, यांचेमध्ये करावे व त्याबाबत केलेली कार्यवाही तात्काळ शासनास कळवावी.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र.पु.क्र.५३३/९२/व्यय-११, दिनांक २२.७.१९९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ आ. ज्ञा. खोत ]
कक्ष अधिकारी

प्रत,

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.